# २. बंडूची इजार

बावची गावचा बंडू शांत व कष्टाळू. आपण भलं आणि आपलं काम भलं असा त्याचा स्वभाव. सगळ्या गावात त्याच्या या स्वभावाची चर्चा. सकाळी लवकर शेतात जायचं. दिवसभराचं काम आटोपून संध्याकाळी घराकडे यायचं. घरी आल्यावर आपल्या मुलीशी खेळायचं. कट्ट्यावर चक्कर मारायची अन् जेवायच्या वेळी पुन्हा घरी यायचं, असा त्याचा दिनक्रम!

सावळा रंग, शिडशिडीत अंगकाठी, अन् नाकासमोर चालणारा बंडू. एका वर्षी पीकपाणी बरं झाल्यावर बंडूनं कुटुंबासाठी नवे कपडे अन् स्वत:साठी इजार शिवली. धोंडूमामांनी कपडे शिवले खरे, पण त्यांचा अंदाज जरा चुकला! पुढे...












आईने इजार एका कोनाड्यात फेकली. बंडू हिरमुसला होऊन शेताकडे गेला.




बंडूची बायको इजारीचे पाय कापते
अन् दुमडून टाके घालते.






बंडूची बहीण इजारीचे पाय कापते. दुमडून टाके घालते.






बंडूची आई इजारीचे पाय कापते.
दुमडून टाके घालते.






बंडू इजारीचे पाय चार बोटं कापतो व टाके घालतो.




आँऽऽऽ
सगळेजण आश्चर्याने पाहतात.
मी इजार चार बोटं कापली.
मी पण!
अगंबया, मी पण इजार चार बोटं कापली!
अन् मी पण!
चौघेही खळखळून हसतात.

## स्वाध्याय

**प्र. १. चर्चा करून उत्तरे लिहा.**

(अ) बंडूची इजार लांब झाली म्हणून कापून कमी केली. जर ती आखूड झाली असती, तर ती लांब करण्यासाठी काय करावे लागले असते? शक्य तेवढे सगळे मार्ग सुचवा.

(आ) इजारीची चड्डी झाली, यात चूक कोणाची?

(इ) बंडूच्या इजारीचे पाय चार बोटे कापले, म्हणजे 'पाय' असणारी इजार सजीव आहे, असे आपण म्हणत नाही; पण बोलताना आपण असेच बोलतो. इजारीसारख्या कितीतरी वस्तूंना वेगवेगळ्या अवयवांची नावे वापरतात. त्यांची नावे सांगा.

**प्र. २. खालील वाक्यांमध्ये कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा. त्या वाक्यांचा अर्थ लिहा.**

(कान, नाक, पाय, हात, डोळा, केस, पाठ, पोट, गळा, तोंड)

(अ) चुलीवरच्या तव्याची ............... काळीभोर झाली होती.

(आ) कपाचा ............... तुटला होता, म्हणून दिलावरने चहा ग्लासात ओतला.

(इ) 'हा नारळ नासका निघणार,' नारळाचा ............... बघून धनव्वा म्हणाली.

(ई) मुसळधार पाऊस पडल्यामुळे नदीचे ............... फुगले होते.

(उ) कितीही जोर लावला तरी बाटलीचे ............... उघडेना.

(ऊ) चरवीतले दूध गंजात ओतले, तर ते गंजाच्या ............... पर्यंत आले.

(ए) सुईच्या ............... दोरा ओवून धोंडूमामांनी शिलाई मशीन सुरू केली.

(ऐ) आंब्याच्या कोईचे ............... पांढरे होईपर्यंत गणू कोय चोखत राहिला.

(ओ) आपले शेकडो ............... पसरून उभे असलेले वडाचे झाड वर्षानुवर्षे सगळ्यांना सावली देते.

(औ) खोलीतल्या एकमेव खुर्चीचा ............ मोडला होता, म्हणून मी जमिनीवर बसलो.

- 'भिंतीलाही कान असतात.' ही म्हण आपण वापरतो. 'भिंतीला' कपांप्रमाणे कान नसतात. भिंतीला 'कान' असतात, हे कोणत्या अर्थाने वापरले आहे, ते शिक्षक, पालक यांच्याशी चर्चा करून सांगा.

वरीलप्रमाणे 'त्याच्या पैशाला पाय फुटले,' असेही बोलताना आपण म्हणतो. यासारखी उदाहरणे शोधा. त्यांचा अर्थ माहीत करून घ्या. बोलण्यात त्यांचा वापर करा.

**शिक्षकांसाठी :** या चित्रकथेचे नाट्यीकरण विद्यार्थ्यांकडून वर्गात सादर करून घ्यावे. या पाठाचे अभिवाचन घ्यावे.

- या पाठ्यपुस्तकातील ज्या शब्दांचे अर्थ समजणार नाहीत, त्या शब्दांची यादी विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगावी. त्या शब्दांचे अर्थ शब्दकोशात शोधून त्यांचा संग्रह 'माझा शब्दसंग्रह' या वहीत करायला सांगावे.